जा.क्र.का.15/वामुदत 2019-20/ 355
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.01/04/2019.

**आदेश**

विषय :- सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक मूल्य दर तक्त्याबाबत...

संदर्भ :- शासनाचे गोपनीय पत्र क्र.मुद्रांक-2019/प्र.क्र.103/म-1 (धोरण), दि.1/4/2019.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम क्र.4 (3) अन्वये प्रतीवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक दर तक्ते निर्गमित करण्यात येतात.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम 4 च्या उप-नियम क्र.(9) मधील तरतूदी अन्वये शासनाने संदर्भित पत्रान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"वर्ष 2018-19 चे वार्षिक दर विवरणपत्र कोणतीही वाढ किंवा घट न करता, वर्ष 2019-20 मध्ये चालू ठेवणेत यावेत".

त्याअर्थी, शासनाचे निदेश विचारात घेऊन सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरीता, सन 2017-18 चे सन 2018-19 साठी अंमलात असलेले वार्षिक दर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शक सूचना (वेळोवेळी परिपत्रकाव्दारे केलेल्या बदलासह) व नविन बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत येत आहेत.

सदरचे वार्षिक दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online services या सदराखाली eASR या ठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

( अनिल कवडे )
मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर:-

1) मा.सचिव (महसूल,नोंदणी व मुद्रांक विभाग), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2) मा.महालेखापाल,(लेखापरिक्षा)-II, नागपूर.

E:\technical\ASR 2019-20-ASR ORDER

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

1) अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे.
3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे माहिती व कार्यवाहीसाठी.
5) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
6) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.

   सदर आदेश या विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

   -/ सदर आदेशाबाबत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना तात्काळ अवगत करण्यात यावे. तसेच सदर आदेश त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

10) सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय,मंत्रालय,मुंबई-32.
11) प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.
12) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक.

   सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सदर आदेशाबाबत तात्काळ अवगत करावे.

E:\technical\ASR 2019-20-ASR ORDER